महाराष्ट्र शा.नि.क्र.
...बी.सी.-१९९०/(३५४६) मही सी - २
दि. १३ जुलै १९९०

स.ब.वि.प्र.समाजाचे,

# सहकारमहर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय

संगमनेर, ता. संगमनेर - ४२२६०५, जि. अहमदनगर (महाराष्ट्र).

नॅक पुनर्मुल्यांकन श्रेणी 'बी'



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न
...फिकेशन नं. PU/AN/ASC/035/1990

प्राचार्य डॉ. दिनानाथ पाटील (एम.एससी., एम.फिल., पीएच.डी.)


फोन नं. ऑफिस : ०२४२५-२२६०७६ मोबाईल : ९४२०६३८००३ वेब साईट : www.smbstcollege.com
ई-मेल : smbstcollege@gmail.com AISHE Code - C-41632 आयएसओ प्रमाणित : 9001-2015


जावक क्र. 653 /२०२० - २०२१ दिनांक : 02 / 03/२०२१

## "मराठी भाषा गौरव दिन व जेष्ठ कवी कुसुमाग्रज जयंती"

**अहवाल** दि.२७/०२/२०२१

सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात, कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,संगमनेर.मराठी विभागातर्फे दिनांक २७/०२/२०२१ रोजी सकाळी ठीक १०.३० वाजता मराठी भाषा गौरव दिन व कवीवर्य कुसुमाग्रज जयंती साजरी करण्यात आली या निमित्ताने महाविद्यालयात कार्यक्रम घेण्यात आला.या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ,दिनानाथ पाटील,उपप्राचार्य श्री शिवाजी नवले विद्यार्थी कल्याण अधिकारी श्री राजेंद्र जोरवर आदी. उपस्थित होते.प्रा.तांबे .एस. एम. यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. उपस्थित मान्यवरांनी जेष्ठ कवी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन केले.

जयंती निमित्ताने ऑनलाईन सुविधेचा वापर करून श्री राजेंद्र जोरवर यांनी विद्यार्थ्यांना कुसुमाग्रज यांचे साहित्यिक योगदान आणि वाचन लेखन ही काळाची गरज या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले. मुलांनी वाचनाकडे वळले पाहिजे आणि आपली बौद्धिक प्रगती साधली पाहिजे असेही ते म्हणाले या नंतर त्यांनी मराठी भाषेची महती सांगून मराठी भाषेच्या विकासासाठी आपण सर्वांनी कटिबद्ध असले पाहिजे असे आव्हान केले. मराठी भाषेचे संवर्धन आपण केले पाहिजे, आजचे युग तंत्रज्ञानाचे युग आहे. त्यात आपण मागे पडू नये म्हणून संगणकीय ज्ञान मिळविणे काळानुसार गरजेचे आहे.आपल्या राज्यात आपण सर्व ठिकाणी मातृभाषेचा म्हणजेच मराठी भाषेचा वापर आपण जास्तीत जास्त करावा. पहिली पासून ते महाविद्यालीन शिक्षणापर्यंत प्रत्येक विद्यार्थ्याला प्रत्येक वर्गात मराठी विषय सक्तीचा असावा असेही त्यांनी मत मांडले.मराठी भाषा गौरव दिनानिमित्त हस्ताक्षर स्पर्धा घेण्यात आली. कार्यक्रमासाठी ४५ विद्यार्थी सहभागी झाले होते. शासनाने वेळोवेळी कोविड -१९ च्या संदर्भात निर्गमित केलेल्या नियमाचे पालन करुन कार्यक्रम साजरा करण्यात आला.

महाविद्यालयाचे प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी या कार्यक्रमास उपस्थित होते.यानंतर प्रा. तांबे .एस. एम यांनी उपस्थितांचे आभार मानले.

स.म. थोरात महाविद्यालय कॉलेज कोड-२०१ संगमनेर

प्राचार्य
सहकार महर्षि भाऊसाहेब संतूजी थोरात
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय
संगमनेर, जि. अहमदनगर